RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ९१(४)] शुक्रवार, जून ३०, २०२३/आषाढ ९, शके १९४५ [पृष्ठे १५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २५३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांव्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जून २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक बीएड ४६२३/प्र.क्र.११०/मशि-२.—महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा.२८) याच्या कलम २३ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था [व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर शिक्षक प्रशिक्षण अध्ययनक्रमांना, म्हणजेच (शिक्षणशास्त्र पदवी, शारीरिक शिक्षण पदवी, शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी, शारीरिक शिक्षण पदव्युत्तर पदवी) द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन)] नियम, २०१७ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेः—

१. या नियमांस, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था [व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर शिक्षक प्रशिक्षण अध्ययनक्रमांना म्हणजेच (शिक्षणशास्त्र पदवी, शारीरिक शिक्षण पदवी, शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी, शारीरिक शिक्षण पदव्युत्तर पदवी) द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन] (*सुधारणा) नियम, २०२३ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था [व्यावसायिक पदवी पूर्व आणि पदव्युत्तर शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे नियमन म्हणजेच (शिक्षणशास्त्र पदवी, शारीरिक शिक्षण पदवी, शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी) द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन] नियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य नियम" असा केला आहे) याच्या नियम ३ मधील पोट-नियम (३) ऐवजी, पुढील पोट -नियम दाखल करण्यात येईलः—

"(३) उमेदवार, अर्जासोबत, एस.एस.सी. किंवा एच.एस.सी. परीक्षा किंवा पदवीपूर्व पदवी किंवा पदव्युत्तर पदवी परीक्षा गुणपत्रिका, अधिवास प्रमाणपत्र, जन्म प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रमाणपत्र, नॉन क्रीमी लेयर प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र यांसारखे आवश्यक मूळ कागदपत्रे किंवा इतर कोणतेही आवश्यक प्रमाणपत्र, लागू असल्याप्रमाणे, असे प्रमाणपत्र देण्यास सक्षम असलेल्या संबंधित प्राधिकरणाने निर्गमित केलेल्या आवश्यक

प्रपत्रामध्ये सादर करील. जर उमेदवार, कॅप (केंद्रीभूत प्रवेश प्रकिया) अर्ज भरतेवेळी, आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्यास निष्फळ ठरला तर, त्यांचा कॅपअर्ज हा अपूर्ण अर्ज असल्याचे मानण्यात येईल आणि तो, गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी किंवा जागा वाटपासाठी विचारात घेतला जाणार नाही.”.

३. मुख्य नियमांच्या नियम ५ मधील, पोट-नियम (१) ऐवजी, पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल :—

“(एक) महाराष्ट्र राज्य उमेदवारी :–

“(एक) शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड), शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी (एम.एड), शारीरिक शिक्षण पदवी (बी.पी.एड), शारीरिक शिक्षण पदव्युत्तर पदवी (एम.पी.एड), आणि एकात्मिक शिक्षणशास्त्र पदवी व शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रमाच्या (एकात्मिक बी.एड व एम.एड) प्रवेशासाठी महाराष्ट्र राज्य उमेदवारीकरिता पात्रता निकष पुढीलप्रमाणे असतील :–

**तक्ता**

| अ.क्र. (१) | महाराष्ट्र राज्य उमेदवारी प्रकार (२) | पात्रतेचे निकष (३) |
|---|---|---|
| १. | क | (एक) जो उमेदवार, संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या कायद्यांद्वारे स्थापन केलेल्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त संस्थेमधून किंवा महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठाच्या कोणत्याही विद्याशाखेतून अथवा अभिमत विद्यापीठ म्हणून मान्यताप्राप्त असलेल्या महाराष्ट्रातील समकक्ष राष्ट्रीय संस्थेमधून किंवा भारतीय विद्यापीठाच्या दर्जाशी समकक्ष दर्जा आहे असे घोषित करण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकरणाने समकक्ष विद्यापीठ म्हणून मान्यता दिलेल्या महाराष्ट्रातील, किंवा यथास्थिति, महाराष्ट्र राज्याबाहेरील विदेशी विद्यापीठातून पदवी किंवा पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झालेला आहे, असा उमेदवार; आणि<br>(दोन) जो उमेदवार, एकतर, महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे आणि / किंवा महाराष्ट्र राज्यात जन्मलेला आहे, असा उमेदवार. |
| २. | ख | जो उमेदवार, “प्रकार-क” च्या खंड (एक) मध्ये नमूद केलेले निकष पूर्ण करतो परंतु वरील “प्रकार-क” च्या खंड (दोन) मध्ये नमूद केलेल्या निकषांची पूर्तता करीत नाही, परंतु ज्याचे वडील किंवा आई महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आहे व ते अधिवास प्रमाणपत्र धारण करतात, असा उमेदवार. |
| ३. | ग | जो उमेदवार, “प्रकार-क” च्या खंड (एक) मध्ये नमूद केलेल्या निकषांची पूर्तता करतो परंतु “प्रकार-क” च्या खंड (दोन) किंवा “प्रकार-ख” मध्ये नमूद केलेल्या निकषांची पूर्तता करीत नाही परंतु, ज्या उमेदवाराचे वडील किंवा आई भारत सरकारचे किंवा भारत सरकारच्या उपक्रमातील कर्मचारी आहेत व ज्यांची पदस्थापना महाराष्ट्र राज्यात झालेली आहे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेच्या आधी ते महाराष्ट्र राज्यात कर्तव्यावर रुजू झालेले आहेत, असा उमेदवार. |
| ४. | घ | जो उमेदवार, “प्रकार-क” च्या खंड (एक) मध्ये नमूद केलेल्या निकषांची पूर्तता करतो परंतु “प्रकार-क” च्या खंड (दोन) किंवा “प्रकार-ख” आणि “प्रकार-ग” मध्ये नमूद केलेल्या निकषांची पूर्तता करत नाही परंतु ज्या उमेदवाराचे वडील किंवा आई महाराष्ट्र शासनाचे किंवा महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमाचे कर्मचारी किंवा निवृत्त कर्मचारी आहेत, असा उमेदवार. |
| ५. | ङ | जे उमेदवार, महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमा क्षेत्रातील किंवा महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेतून पदवी आणि/किंवा पदव्युत्तर पदवी परीक्षा किंवा तिच्याशी समकक्ष असलेली परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत आणि महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमा भागात राहत आहेत आणि ज्यांची मातृभाषा मराठी आहे, असे उमेदवार. |

(दोन) विज्ञान पदवी - शिक्षणशास्त्र पदवी (बी.एस्सी. बी.एड) च्या किंवा कला पदवी - शिक्षणशास्त्र पदवी (बी.ए बी.एड) च्या चार वर्षांच्या एकात्मिक पदवी पाठ्यक्रमाच्या प्रवेशासाठी महाराष्ट्र राज्य उमेदवारीकरिता पात्रता निकष पुढीलप्रमाणे असतील :–

**तक्ता**

| अ.क्र.<br>(१) | महाराष्ट्र राज्य उमेदवारी प्रकार<br>(२) | पात्रतेचे निकष<br>(३) |
|---|---|---|
| १. | क | (एक) जे उमेदवार, महाराष्ट्रातील किंवा यथास्थिति, महाराष्ट्र राज्याबाहेरील मान्यताप्राप्त संस्थेमधून एस.एस.सी. आणि एच.एस.सी. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असतील, असे उमेदवार; आणि<br>(दोन) जो उमेदवार, एकतर महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे आणि / किंवा महाराष्ट्र राज्यात जन्मलेला आहे, असा उमेदवार. |
| २. | ख | जो उमेदवार, "प्रकार-क" च्या खंड (एक) मध्ये नमूद केलेले निकष पूर्ण करतो परंतु "प्रकार-क" च्या खंड (दोन) मध्ये नमूद केलेल्या निकषांची पूर्तता करीत नाही, परंतु ज्याचे वडील किंवा आई महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आहे व ते त्यांच्याकडे अधिवास प्रमाणपत्र धारण करतात, असा उमेदवार. |
| ३. | ग | जो उमेदवार, "प्रकार-क" च्या खंड (एक) मध्ये नमूद केलेल्या निकषांची पूर्तता करतो परंतु "प्रकार-क" च्या खंड (दोन) किंवा "प्रकार-ख" मध्ये नमूद केलेल्या निकषांची पूर्तता करीत नाही परंतु ज्या उमेदवाराचे वडील किंवा आई भारत सरकारचे किंवा भारत सरकारच्या उपक्रमातील कर्मचारी आहेत व ज्यांची पदस्थापना महाराष्ट्र राज्यात झालेली आहे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेच्या आधी ते महाराष्ट्र राज्यात कर्तव्यावर रुजू झालेले आहेत, असा उमेदवार. |
| ४. | घ | जो उमेदवार, "प्रकार-क" च्या खंड (एक) मध्ये नमूद केलेल्या निकषांची पूर्तता करतो परंतु "प्रकार-क" च्या खंड (दोन) किंवा "प्रकार-ख" आणि "प्रकार-ग" मध्ये नमूद केलेल्या निकषांची पूर्तता करीत नाही परंतु ज्या उमेदवाराचे वडील किंवा आई महाराष्ट्र शासनाचे किंवा महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमाचे कर्मचारी किंवा निवृत्त कर्मचारी आहेत, असा उमेदवार. |
| ५. | ङ | जे उमेदवार, महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमा क्षेत्रातील किंवा महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेतून एस.एस.सी आणि/किंवा एच.एस.सी किंवा तिच्याशी समकक्ष असलेली परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत आणि महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमा क्षेत्रात राहत आहेत आणि ज्यांची मातृभाषा मराठी आहे, असे उमेदवार.". |

४. मुख्य नियमांच्या नियम ८ मध्ये, पोट-नियम (३) मधील, खंड (चार) नंतर, पुढील खंड (पाच) समाविष्ट करण्यात येईलः—

"(पाच) विज्ञान पदवी - शिक्षणशास्त्र पदवी (बी.एस्सी. बी.एड) च्या किंवा कला पदवी - शिक्षणशास्त्र पदवी (बी.ए बी.एड) च्या चार वर्षांच्या एकात्मिक पदवी पाठ्यक्रमाच्या पहिल्या वर्षांच्या प्रवेशासाठीः-

(एक) या नियमांच्या नियम ५(१), ५(२), ५(३) व ५(६) अनुसार उमेदवारांची गुणवत्ता यादी ही, सक्षम प्राधिकरणाने घेतलेल्या सीईटीत उमेदवाराला मिळालेल्या गुणांच्या किंवा प्राप्तांकाच्या आधारे तयार करण्यात येईलः

परंतु, समसमान, प्राप्तांक किंवा टक्केवारी असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील प्राधान्यक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरवण्यात येईलः—

(क) अर्हता परीक्षेतील, म्हणजेच एच.एस.सी. किंवा समतुल्य परीक्षेतील एकूण गुणांची अधिकतम टक्केवारी;

(ख) एस.एस.सी. किंवा समतुल्य परीक्षेतील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ग) वयाने मोठा असलेला उमेदवार.

(दोन) या नियमांच्या नियम ५(४) व ५ (५) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, अनिवासी भारतीय/ भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेले/भारतीय वंशाची व्यक्ती असलेले उमेदवार आणि विदेशी विद्यार्थी उमेदवार यांची गुणवत्ता यादी ही, अर्हता परीक्षेमध्ये मिळालेल्या टक्केवारीच्या आधारे तयार करण्यात येईल :

परंतु, समसमान टक्केवारी असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता, पुढील प्राधान्यक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल :—

(क) अर्हता परिक्षेतील, म्हणजेच एचएससी किंवा समतुल्य परीक्षेतील एकूण गुणांची अधिकतम टक्केवारी;

(ख) एसएससी किंवा समतुल्य परीक्षेतील गुणांची अधिकतम टक्केवारी.

(ग) वयाने मोठा असलेला उमेदवार.".

५. मुख्य नियमांच्या नियम ९ मध्ये ,-

(१) पोट-नियम (१) मधील,-

(एक) विद्यमान खंड (क) च्या आधी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :-

"(१-क) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत (कॅप) सहभागी होण्यासाठी इच्छुक असलेल्या महाविद्यालयांनी किंवा संस्थांनी, उच्च शिक्षण संचालनालयाने घोषित केलेल्या वेळापत्रकानुसार कॅपसाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. उच्च शिक्षण संचालनालयाने मान्यता दिलेली महाविद्यालये किंवा संस्था यांचाच केवळ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) फेऱ्यांमध्ये जागा वाटपासाठी विचार करण्यात येईल.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) सुरू झाल्यानंतर, कोणत्याही नवीन महाविद्यालयास किंवा नवीन अतिरिक्त तुकडीला केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) आणि संस्थात्मक स्तरावरील फेरीसाठी कोणत्याही परिस्थितीत, नोंदणी करण्याची परवानगी दिली जाणार नाही;";

(दोन) खंड (ङ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :-

"(ङ) तात्पुरत्या गुणवत्ता याद्या प्रदर्शित किंवा प्रसिद्ध करणे, या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने विहित केलेल्या पद्धतीनुसार तक्रारी, कोणत्याही असल्यास, दाखल करून घेणे आणि अंतिम गुणवत्ता याद्या प्रदर्शित किंवा प्रसिद्ध करणे.".

(तीन) खंड (छ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल:-

"(छ) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या व तिसऱ्या फेरीपूर्वी संस्थांचा पसंतीक्रम असणारा ऑनलाईन विकल्प नमुना भरणे व त्यास पुष्टी देणे. उमेदवारांना, त्यांच्या पसंतीच्या क्रमाने संस्थांचे प्राधान्यक्रम भरता येतील. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीपूर्वी विकल्प नमुन्यास एकदा का पुष्टी दिली की मग तो विकल्प नमुना, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या व दुसऱ्या फेरीच्या जागा वाटपासाठी विचारात घेण्यात येईल आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) तिसऱ्या फेरीपूर्वी पुष्टी दिलेला विकल्प नमुना, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या केवळ तिसऱ्या फेरीच्या जागा वाटपासाठीच विचारात घेण्यात येईल ;";

(२) पोट-नियम (३) नंतर, पुढील पोट-नियम समाविष्ट करण्यात येईल:-

"(४) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची (कॅप) दुसरी फेरी आयोजित करणे.–

(क) दुसऱ्या फेरीकरिता उपलब्ध असलेल्या जागा, संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील;

(ख) दुसरी फेरी ही, ज्या उमेदवारांना त्यांच्या पहिल्या पसंतीक्रमांकाव्यतिरिक्त इतर पसंतीक्रमांकावरील जागेचे वाटप करण्यात आलेले असेल आणि ज्या उमेदवारांना पहिल्या फेरीत कोणतीही जागा वाटप करण्यात आलेली नसेल अशा उमेदवारांकरिता पसंतीक्रमांक सुधार फेरी (बेटरमेंट राऊंड) असेल;

(ग) उमेदवारास, दुसऱ्या फेरीनंतर, आणखी कोणताही पसंतीक्रमांक सुधार (बेटरमेंट) विकल्प उपलब्ध असणार नाही. उमेदवारांना दुसऱ्या फेरीत करण्यात आलेले वाटप/किंवा टिकवून ठेवलेले वाटप हे, अंतिम वाटप असेल ;";

(३) पोट-नियम (५) मधील, —

(एक) "केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची दुसरी फेरी आयोजित करणे" या शीर्षकाऐवजी "केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी आयोजित करणे" हे शीर्षक दाखल करण्यात येईल.

(दोन) खंड (क) मधील "दुसऱ्या फेरीकरिता" या मजकुराऐवजी "तिसऱ्या फेरीकरिता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(तीन) खंड (ख) मधील "दुसऱ्या फेरीकरिता" या मजकुराऐवजी "तिसऱ्या फेरीकरिता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(चार) खंड (ग) मधील, "जर उमेदवारास दुसऱ्या प्रवेश फेरीमध्ये जागा वाटप न झाल्यास, पहिल्या फेरीमध्ये वाटप झालेली जागा" या मजकुराऐवजी "जर उमेदवारास तिसऱ्या प्रवेश फेरीमध्ये कोणतीही जागा वाटप न झाल्यास, पहिल्या, किंवा यथास्थिति, दुसऱ्या फेरीमध्ये वाटप झालेली जागा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

६. मुख्य नियमांच्या नियम ११ मध्ये,—

(१) "केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅपच्या) पहिल्या व दुसऱ्या फेरीद्वारे जागांचे वाटप करणे,-" या शीर्षकाऐवजी, "केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅपच्या) पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीद्वारे जागांचे वाटप करणे,-" हे शीर्षक दाखल करण्यात येईल;

(२) पोट-नियम (१) मधील,"केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) पहिली व दुसरी फेरी" या मजकुराऐवजी, "केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) पहिली, दुसरी व तिसरी फेरी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(३) पोट-नियम (३) नंतर, पुढील पोट-नियम समाविष्ट करण्यात येईलः-

"(४) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅपच्या) तिसऱ्या फेरीमध्ये,-

(क) अल्पसंख्याक संस्थांसाठी, पुढील प्राधान्यक्रमानुसार उमेदवारांना जागांचे वाटप करण्यात येईलः

(एक) नियम १० च्या पोट-नियम (३) चा टप्पा - एक,

(दोन) नियम १० च्या पोट-नियम (१) चा टप्पा - एक ते तीन व टप्पा-सात,

(तीन) नियम १० च्या पोट-नियम (३) चा टप्पा-दोन,

(चार) नियम १० चा पोट-नियम (२),

(पाच) नियम १० च्या पोट-नियम (३) चा टप्पा-तीन,

(ख) अल्पसंख्याक संस्थांव्यतिरिक्त अन्य संस्थांसाठी, पुढील प्राधान्यक्रमानुसार उमेदवारांना जागांचे वाटप करण्यात येईल :-

(एक) नियम १० च्या पोट-नियम (१) चा टप्पा - एक ते तीन आणि टप्पा-सात,

(दोन) नियम १० चा पोट-नियम (२).".

७. मुख्य नियमांच्या नियम १२ मध्ये,-

(१) पोट-नियम (क) मधील "कॅपच्या पहिल्या व दुसऱ्या फेऱ्यांमधील" या मजकुराऐवजी, "कॅपच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेऱ्यांमधील" आणि "कॅपच्या पहिल्या व दुसऱ्या फेऱ्यांमध्ये" या मजकुराऐवजी "कॅपच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेऱ्यांमध्ये" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(२) खंड (ण) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील:-

"(त) राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी, महाराष्ट्र राज्य कोट्यातील जागांसाठी त्याच्या ऑनलाइन नोंदणी अर्जामध्ये राखीव प्रवर्गाचा दावा केलेला असावा आणि ज्या उमेदवारांनी, राखीव प्रवर्गातून अर्ज भरला आहे आणि राखीव जागांवर प्रवेश घेतला आहे त्या उमेदवारांनी, मूळ जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागेल, तसेच विमुक्त जाती/ भटक्या जमाती (अ)/ भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग (विशेष मागास प्रवर्गासह), यांमधील उमेदवार, सीईटी परीक्षेच्या पुढील वर्षाच्या ३१ मार्चपर्यंत वैध असणारे मूळ नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र सादर करतील.

(थ) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांनी, महाराष्ट्र राज्य कोट्यातील जागांसाठी ऑनलाइन नोंदणी अर्जामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक असल्याचा दावा केलेला असावा, असे न केल्यास, अशा दाव्याची त्यानंतर दखल घेतली जाणार नाही.

(द) पहिल्या व दुसऱ्या फेरीमध्ये राखीव प्रवर्गासाठी असलेल्या जागेवर सी व्ही सी, एन सी एल, टी व्ही सी, इ. अर्जांच्या पावतीच्या आधारे प्रवेश घेतलेल्या उमेदवारांनी, (जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रीमी लेयर प्रमाणपत्र, जमाती वैधता प्रमाणपत्र, इ.) मूळ प्रमाणपत्र दुसऱ्या फेरीच्या अंतिम दिनांकापूर्वी संगणकप्रणालीवर अपलोड करणे आवश्यक आहे. दुसऱ्या फेरीच्या अंतिम दिनांकास किंवा त्यापूर्वी जे उमेदवार आवश्यक प्रमाणपत्र अपलोड करण्यात निष्फळ ठरतील अशा उमेदवारांचा प्रवेश महाविद्यालय त्यांच्या लॉगिनद्वारे रद्द करतील किंवा ऑनलाइन प्रणालीद्वारे प्रवेश रद्द करण्यात येईल. जर असे उमेदवार, खुल्या प्रवर्गांच्या निकषांची पूर्तता करीत असतील तर ते, पुढील फेरीत खुल्या प्रवर्गातून अर्ज सादर करण्यास पात्र असतील.".

८. मुख्य नियमांच्या नियम १३ मध्ये, खंड (छ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील:—

"(छ) (एक) जर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्या पार पडल्यानंतर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या जागा रिक्त राहिल्यास किंवा झाल्यास, संस्थांतर्गत स्तरावरील प्रवेश फेरीत ती जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान ज्या प्रवर्गाकरिता राखून ठेवलेली होती त्याच प्रवर्गाच्या उमेदवारामधून भरण्यात येईल. त्यानंतरही जागा रिक्त राहिल्यास, त्या जागा, अर्जदारांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे भरण्यात येतील.

(दोन) तसेच, जर प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर कोणतीही केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील (कॅप जागा) जागा, संस्थात्मक कोटा जागा आणि व्यवस्थापन कोटा जागा रिक्त राहिली किंवा रिक्त झाली, तरीही त्या रिक्त जागा रिक्तच राहतील आणि सक्षम प्राधिकरणाने घोषित केलेल्या प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर कोणत्याही महाविद्यालयास किंवा संस्थेला त्या जागांवर प्रवेश देता येणार नाही.".

९. मुख्य नियमांच्या नियम १६ मध्ये,–

(१) पोट-नियम (२) मधील खंड (ख) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :–

"(ख) जो उमेदवार, प्रथम वर्ष (पहिले व द्वितीय सत्र दोन्ही) किंवा द्वितीय वर्ष (दोन्ही तृतीय व चौथे सत्र) किंवा तृतीय वर्ष (पाचवे व सहावे सत्र दोन्ही) किंवा चौथे वर्ष (सातवे व आठवे दोन्ही सत्र) परीक्षा सर्व विषयांसह उत्तीर्ण झालेला असेल असा उमेदवार, संस्था किंवा पाठ्यक्रम बदलून घेण्यास पात्र असेल;";

(२) पोट-नियम (४) ऐवजी, पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल:–

"(४) ज्यांनी केवळ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (कॅप) प्रवेश घेतलेला आहे असे विद्यार्थी, संस्था किंवा पाठ्यक्रम बदलून घेण्यास पात्र असतील.".

१०. मुख्य नियमांना जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये, भाग-अ ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :–

**"भाग-अ**

(प्रथम वर्ष प्रवेशासाठी)
(नियम ७ व ९ पहा )
मंजूर प्रवेश क्षमतेअंतर्गत जागांचे वाटप

| अ. क्र. | संस्थेचा प्रकार | मंजूर प्रवेश क्षमतेच्या टक्केवारी प्रमाणे जागांची संख्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील जागा. | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र राज्यातील ए. एस. उमेदवार | अखिल भारतीय स्तरावरील जागा | अल्पसंख्यांक समाजाचा कोटा | अनिवासी भारतीय (एन आर आय), भारतीय वंशाच्या व्यक्ती (पी आय ओ), भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती (ओ सी आय), विदेशी उमेदवार यांचा ५% कोटा |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | बी. एड./एम.एड. च्या विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (अल्पसंख्याक संस्था वगळून) | स्वायत्त ९०% $ बिगर स्वायत्त ९०% $ | ५% ^ | काही नाही | ५% |
| २ | बी.एड./एम.एड. च्या विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था | स्वायत्त * ३९% बिगर स्वायत्त * ३९% | ५% | किमान ५१%@ | ५% |
| ३ | बी.पी.एड./एम.पी.एड. च्या विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (अल्पसंख्याक संस्था वगळून) | स्वायत्त ८०% $ बिगर स्वायत्त- ८०% $ | १५%^ | काही नाही | ५% |
| ४ | बी.पी.एड./एम.पी.एड. च्या विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था | स्वायत्त * २९% बिगर स्वायत्त * २९% | १५% | किमान ५१%@ | ५% |

कॅप जागा = मंजूर प्रवेश संख्या

$ महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांसाठी जागा = केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील जागा – [अखिल भारतीय स्तरावरील जागा + अल्पसंख्याक उमेदवारांसाठीच्या जागा (कोटा) + अनिवासी भारतीय/भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेले/ भारतीय वंशाची व्यक्ती असलेले उमेदवार/विदेशी विद्यार्थी जागा (कोटा)]

% टक्केवारी.

* अल्पसंख्याक कोट्यातील जागा वगळता, महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेला व अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार आणि अनिवासी भारतीय/ भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेले/ भारतीय वंशाची व्यक्ती असलेले उमेदवार/विदेशी उमेदवार यांच्यामधून निर्धारित टक्केवारीत भरण्यात येतील.

@ ही, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून अल्पसंख्याक संस्थेमध्ये भरावयाच्या जागांची किमान टक्केवारी असून ती १००% पर्यंत वाढविता येऊ शकेल. तथापि, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी, अशी संस्था त्यांच्या संस्थेमध्ये भरावयाची अल्पसंख्याक कोट्यातील कमाल जागांची टक्केवारी घोषित करतील आणि सक्षम प्राधिकाऱ्यास कळवतील.

^ जम्मू व काश्मीरमधून विस्थापित झालेल्या उमेदवारांसाठी एक जागा राखीव असेल. शासनाच्या धोरणानुसार सक्षम प्राधिकरणाद्वारे ही जागा भरण्यात येईल. जर ही जागा रिक्त राहिली तर, अखिल भारतीय उमेदवारी असलेल्या उमेदवारामधून ही जागा भरण्यात येईल.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रताप लुबाळ,**
शासनाचे उप सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 30th June, 2023.

*NOTIFICATION*

Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015.

No. B.ED. 4623/C.R.110/Mashi-2.—In exercise of the powers conferred by section 23 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015), the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Professional Undergraduate and Post-graduate Teacher Training Programme *i.e.* Bachelor of Education, Bachelor of Physical Education, Master of Education, Master of Physical Education) Rules, 2017, namely:–

1. These rules may be called the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Professional Undergraduate and Post-graduate Teacher Training Programme *i.e.* Bachelor of Education, Bachelor of Physical Education, Master of Education, Master of Physical Education) (*Amendment) Rules, 2023.

2. In rule 3 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Professional Undergraduate and Post-graduate Teacher Training Programme *i.e.* Bachelor of Education, Bachelor of Physical Education, Master of Education, Master of Physical Education) Rules, 2017 (hereinafter referred to as "the principal Rules"), for sub-rule (3), the following sub-rule shall be substituted, namely:–

"(*3*) The candidate shall upload, alongwith the application, the required Original documents such as SSC or HSC Mark Sheets or Under Graduate degree or Post Graduate Degree examination, Domicile Certificate, Birth Certificate, Economically Weaker Section (EWS) certificate, Non-Creamy Layer Certificate, Caste Certificate and Caste Validity Certificate or any other requisite certificate, as applicable, in the necessary Proforma issued by the concerned Authority, competent to issue such certificate. If a candidate fails to upload the required documents while filling the CAP application, their CAP application shall be treated as an incomplete application and shall not be considered for merit list preparation or seat allotment.".

3. In rule 5 of the principal Rules, for sub-rule (*1*) the following sub-rule shall be substituted, namely:-

"(*1*) *Maharashtra State Candidature*.—

(*i*) For admission to Bachelor of Education (B.Ed.), Master of Education (M.Ed.), Bachelor of Physical Education (B.P.Ed.), Master of Physical Education (M.P.Ed.) and Integrated Bachelor of Education and Master of Education Course (Integrated B.Ed. and M.Ed.) the eligibility criteria for the Maharashtra State Candidature shall be as follows, namely:–

*Table*

| Sr. No. (*1*) | Maharashtra State Candidature Type (*2*) | Eligibility Criteria (*3*) |
|---|---|---|
| 1. | A | (*i*) A Graduate or Post Graduate Candidate passing from a recognized institution in the Maharashtra in any faculty of any University in the Maharashtra established by an Act of the Parliament or by a State Legislature or an equivalent National Institution recognized as a Deemed to be University or Foreign University in the Maharashtra or outside the Maharashtra State, as the case may be, recognized as equivalent to the status of an Indian University by an authority competent to declare so, and<br>(*ii*) A candidate who is either domicile of the Maharashtra and / or is born in the Maharashtra; |
| 2. | B | A candidate who fulfills the criteria mentioned in clause (i) of "Type A", but does not fulfil criteria mentioned clause (ii) of "Type-A" above, but whose father or mother is domiciled in the State of Maharashtra and possesses domicile certificate. |
| 3. | C | A candidate who fulfills the criteria mentioned in clause (i) of "Type A", but does not fulfil criteria mentioned in clause (ii) of "Type-A" or "Type-B" but whose father or mother is an employee of the Government of India or Government of India Undertaking and who has been posted and reported to duty in the Maharashtra State before the last date for submitting the Application Form for CAP. |
| 4. | D | A candidate who fulfills the criteria mentioned in clause (i) of "Type A", but does not fulfil criteria mentioned in clause (ii) of "Type-A", "Type-B" and "Type-C" but whose father or mother is an employee or retired employee of the Government of Maharashtra or Government of Maharashtra Undertaking. |
| 5. | E | The candidates passing Graduate degree and/ or Post Graduate degree Examination or Equivalent Examination from a recognized Institution from a disputed Maharashtra-Karnataka Border Area or from the Maharashtra State, and residing in the disputed Maharashtra-Karnataka Border Area and whose Mother tongue is Marathi. |

(*ii*) For admission to four years Integrated Degree Courses of Bachelor of Science – Bachelor of Education (B.Sc. B.Ed.) or Bachelor of Arts – Bachelor of Education (B.A. B.Ed.), the eligibility criteria for the Maharashtra State Candidature shall be as follows, namely:-

*Table*

| Sr. No. (*1*) | Maharashtra State Candidature Type (*2*) | Eligibility Criteria (*3*) |
|---|---|---|
| 1. | A | (*i*) The candidates passing SSC and HSC or equivalent Examination from a recognized Institution in the Maharashtra or outside the Maharashtra, as the case may be,; and<br>(*ii*) A candidate who is either domicile of Maharashtra and / or is born in the Maharashtra; |

| (*1*) | (*2*) | (*3*) |
|---|---|---|
| 2. | B | A candidate who fulfills the criteria mentioned in clause (i) in "Type A", but does not fulfil criteria mentioned in clause (ii) of "Type-A" above but whose father or mother is domiciled in the Maharashtra and possesses domicile certificate. |
| 3. | C | A candidate who fulfills the criteria mentioned in clause (i) in "Type A", but does not fulfil criteria mentioned in clause (ii) of "Type-A" or "Type-B" but whose father or mother is an employee of the Government of India or Government of India Undertaking and who has been posted and reported to duty in the Maharashtra State before the last date for submitting the Application Form for CAP. |
| 4. | D | A Candidate who fulfills the criteria mentioned in clause (i) in "Type A", but does not fulfil criteria mentioned in clause (ii) of "Type-A", "Type-B" or "Type-C" but whose father or mother is an employee or retired employee of the Government of Maharashtra or Government of Maharashtra Undertaking. |
| 5. | E | The candidates passing SSC and/ or HSC Examination or equivalent Examination from a recognized Institution from a disputed Maharashtra-Karnataka Border Area or from Maharashtra State, and residing in the disputed Maharashtra-Karnataka Border Area and whose Mother tongue is Marathi. |

4. In rule 8 of the principal Rules, in sub-rule (3), after clause (IV), the following clause (V) shall be inserted, namely:—

(*V*) For admission to the First Year of the Four years Integrated Degree Courses of Bachelor of Science – Bachelor of Education (B.Sc. B.Ed.) or Bachelor of Arts – Bachelor of Education (B.A. B.Ed.).

(*i*) The merit list for the Candidates as per rules 5(1), 5(2), 5(3) and 5(6) of these rules, shall be prepared on the basis of marks or score secured by the Candidate in the CET conducted by the Competent Authority:

Provided that, in case of tie, the relative merit of candidates shall be resolved in the following order of preference and the methodology as specified below,—

(*a*) higher percentage of aggregate Marks in Qualifying Examination *i.e.* HSC or Equivalent Examination;

(*b*) higher percentage of Marks in SSC or equivalent examination;

(*c*) older in age.

(*ii*) The merit list for the NRI/OCI/PIO and Foreign Students Candidates stated at rules 5(4) and 5(5) shall be prepared on the basis of the percentage of marks in Qualifying Examination:

Provided that, in case of tie, the relative merit of Candidates shall be resolved in the following order or preference and the methodology, as specified below:-

(*a*) higher percentage of aggregate Marks in Qualifying Examination *i.e.* HSC or Equivalent Examination;

(*b*) higher percentage of marks in SSC or equivalent examination;

(*c*) older in age.

5. In rule 9 of the principal Rules,—

(*1*) in sub-rule (1),–

(*i*) before the existing clause (a), the following clause shall be inserted, namely:–

"(*I-a*) The Colleges or Institutes willing to participate in the Centralized Admission Process (CAP) shall have to register for CAP as per schedule declared by the Directorate of Higher Education. The Colleges or Institutes registered and approved by the Directorate of Higher Education shall only be considered for seat allotment in CAP Rounds.

In any case any new College or new additional division shall not be allowed to register for CAP and Institutional Level Round after commencement of process for CAP;";

(*ii*) for clause (e), the following clause shall be substituted, namely:—

"(*e*) Display or publishing of provisional merit lists, submission of grievances, if any, through the method prescribed by the Competent Authority for this purpose and display or publishing of final merit lists.".

(*iii*) for clause (g), the following clause shall be substituted, namely:—

"(*g*) Filling up and confirmation of online option form having preferences of Institutions prior to CAP Round-I and CAP Round-III. The candidates may fill in preferences of Institutes in order of their preference. The option form once confirmed prior to CAP Round-I shall be considered for allotment in the CAP Rounds I and II and the option form confirmed prior to CAP Round III shall be considered for allotment in CAP Round III only;";

(*2*) after sub-rule (3), the following sub-rule shall be inserted, namely:—

"(*4*) Conduct of CAP Round II.–

(*a*) The seats available for Round-II shall be published on the website.

(*b*) Round-II shall be betterment Round for those candidates who have been allotted seat other than first preference and who have been not allotted any seat in Round-I.

(*c*) There shall be no further betterment option available to the Candidate after Round II. The allotment made and/or allotment retained in Round II shall be final;";

(*3*) in sub-rule (5),—

(*a*) for the heading "Conduct of CAP II-", the heading "Conduct of CAP III.-" shall be substituted;

(*b*) in clause (a), for the word and letters "Round II", the word and letters "Round III" shall be substituted;

(*c*) in clause (b), for the word and letters "Round-II", the word and letters "Round-III" shall be substituted;

(*d*) in clause (c), for the words and letters "If the candidate is not allotted any seat in Round-II, the seat allotted in Round-I", the words and letters "if the candidate is not allotted any seat in Round-III, the seat allotted in Round-I or II, as the case may be", shall be substituted.

6. In rule 11 of the principal Rules,—

(*1*) for the heading "Allotment of seats by CAP Rounds I and II-", the heading "Allotment of seats by CAP Rounds I, II and III.-" shall be substituted;

(*2*) in sub-rule (1), for the words and letters "CAP Rounds I and II", the words and letters "CAP Rounds I, II and III" shall be substituted;

(*3*) after sub-rule (3), the following sub-rule shall be inserted, namely:-

"(*4*) In CAP Round III.–

(*a*) For Minority Institutions, the allotment shall be given to the candidates as per following preference:–

(*i*) Stage I of sub-rule (3) of rule 10,

(*ii*) Stages I to III and Stage VII of sub-rule (1) of rule 10,

(*iii*) Stage II of sub-rule (3) of rule 10,

(*iv*) sub-rule (2) of rule 10,

(*v*) Stage III of sub- rule (3) of rule 10.

(*b*) For other than Minority Institutions, the allotment shall be given to the candidates as per following preference:-

(*i*) Stages I to III and Stage VII of sub-rule (1) of rule 10,

(*ii*) sub-rule (2) of rule 10.

7. In rule 12 of the principal Rules,—

(*1*) in clause (a), for the letters and words "CAP Rounds I and II,", the letters and words "CAP Rounds- I, II and III" shall be substituted;

(*2*) after clause (*o*), the following clauses shall be inserted, namely:-

(*p*) The candidates belonging to reserved category must have claimed so in his online registration form of Maharashtra State quota seats, and those candidates who have filled application form from reserved category and admitted on seats for reserved category shall have to submit the original Caste Validity Certificate, also the candidates belonging to VJ/DT(A), NT(B), NT(C), NT(D), OBC (including SBC) shall submit original non-creamy layer certificate valid up to 31st March of the following year of CET examination.

(*q*) The candidates belonging to EWS category shall claim so in his online registration form of Maharashtra State quota seats, failing which such claim shall not be entertained subsequently.

(*r*) The candidates belonging to reserved category who have secured admission on seats for reserved category in Rounds I and II on the basis of application receipt of CVC, NCL, TVC etc. are required to upload the necessary original certificate (CVC, NCL, TVC etc.) on or before the last date of Round II. The candidates who failed to upload the necessary certificate, their admission shall be cancelled by the college through its login or through online system. These students may apply for the next round from open category, if they meet the requirements and conditions for the open category.

8. In rule 13 of the principal Rules, for clause (g), the following clause shall be substituted, namely:—

"(*g*)(*i*) If any CAP seat remains or becomes vacant after the CAP Rounds, then in the Institutional Level Round, the same shall be filled in by the Candidate from the same Category for which it was earmarked during the CAP. Further if the seats remain vacant, then the seats shall be filled on the basis of Inter-Se-Merit of the applicants.

(*ii*) Further, if any CAP seats, ACAP (against CAP) seats, Institutional Quota seats and Management quota seats remains or becomes vacant after the cut-off date of the admission, then the vacant seats shall remain vacant and there shall be no admission

in any College or Institute after the cut-off date declared by the Competent Authority.

9. In rule 16 of the principal Rules,—

(*1*) in sub-rule (2), for clause (b), the following clause shall be substituted, namely :—

"(*b*) The Candidate who has passed the First Year (both first and second semester) or Second Year (both third and fourth semester) or Third Year (both fifth and sixth semester) or Fourth Year (both seventh and eighth Semester) examinations with all subjects, shall be eligible for transfer of Institution or course;";

(*2*) for sub-rule (4), the following sub-rule shall be substituted, namely:–

"(*4*) The students, who are admitted through the Centralized Admission Process (CAP) only, shall be eligible for transfer of Institution or Course.".

10. In the Schedule-I appended to the principle Rules, for Part-A the following shall be substituted, namely:—

*"PART-A*

(For First Year Admission)
(See rules 7 and 9)
Allocation of seats within Sanctioned Intake

| Sr. No. | Type of Institution | No. of Seats - as % of Sanctioned Intake | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | CAP Seats | | | |
| | | Maharashtra State (M.S.) Candidates | All India Seats | Minority Quota | 5% Quota for NRI PIO, OCI, Foreign National |
| 1. | Unaided Private Professional Educational Institutions for B.Ed/ M.Ed. (excluding minority institutions) | Autonomous$ = 90% & Non-Autonomous$ = 90% | 5%^ | Nil | 5% |
| 2. | Unaided Minority Educational Institutions for B.Ed/ M.Ed. | Autonomous* = 39% Non- Autonomous* = 39% | 5% | Minimum 51%@ | 5% |
| 3. | Unaided Private Professional Educational Institutions for B.P.Ed/M.P.Ed (excluding minority institutions) | Autonomous$ = 80% & Non-Autonomous$ = 80% | 15%^ | Nil | 5% |
| 4. | Unaided Minority Educational Institutions for B.P.Ed/ M.P.Ed. | Autonomous* = 29% Non- Autonomous* = 29% | 15% | Minimum 51%@ | 5% |

CAP Seats = Sanctioned Intake

$ M.S. Seats = CAP Seats- (All India Seats + Minority Quota + NRI/OCI/PIO/Foreign Quota)

% Percentage

* The seats excluding the Minority Quota shall be filled in the stipulated percentage from the Maharashtra State Candidature Candidate and All India Candidature candidates and NRI/OCI/PIO/Foreign candidates.

@ These are the minimum percentage of seats to be filled in the Minority Institution through CAP, this may be extended up to 100%. However before commencement of the CAP, such Institution shall declare and inform to the Competent Authority, the maximum percentage of minority quota to be filled in their institution.

^ One seat reserved for Jammu and Kashmir Migrant Candidates. This seat shall be filled by the Competent Authority as per the policy of the Government. If the seat remains vacant, it shall be filled through All India Candidature candidate.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRATAP LUBAL
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.